**संक्षिप्त फौ. ख. क्र.२१८/२०२३**
**सरकार -वि.- संजय मानकर**
**नि.क्र. १३ खाली.**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.६ यांची जबानी</u>**

**<u>मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव - विठ्ठल शंकरराव तितरमारे,
वय ६१ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त पोलीस हवालदार,
राहणार – वेलतुर ता. कुही, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज कोर्टात हजर आहे. मी फिर्यादीला ओळखतो. दिनांक १८.०३.२०२३ रोजी मी पोलीस स्टेशन, भिवापूर येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी गुन्हा क्रमांक ११०/२०२३ नोंद झाला होता. प्राथमिक तपास शैलेश नागरे यांनी केला होता. पुढील तपास माझ्याकडे आला. तपासा दरम्यान मी जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले, आर.टी.ओ.चा अहवाल प्राप्त केला व तसापाअंती दोषारोप पत्र दाखल केले.

सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी आर.टी.ओ.चा अहवाल प्राप्त केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी सोबत संगनमत करुन खोटा तपास करुन खोटे दोषारोप पत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक ०९.०२.२०२६.